<u>रे.क.नं. ३९६/२०१४ मधील नि. ५ खालील आदेश.</u>

वादीनी प्रस्तुतचा दावा कायम मनाई ताकीदीसाठी आणि प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाईसाठी केलेला आहे.

२. वादींचे थोडक्यात म्हणणे की, मौजे कोरोची ता. हातकणंगले येथील गट नं. ८७३ क्षेत्र - ० हे. ३८ आर., गट नं. ८७५ क्षेत्र - ० हे. ९ आर., गट नं. ८७६ क्षेत्र - ० हे. १९ आर., गट नं. ८७७ क्षेत्र - ० हे. १० आर या दावा मिळकती आहेत. दावा मिळकती या 'श्री जैन बस्ती देव' या जैन मंदिराच्या मालकीच्या आहेत. वादींचे पुर्वहक्कदार व वादींच्याकडे पुर्वापार वंशपरंपरागत पध्दतीने सदर मिळकती जैन बस्ती मंदिराचे उपाध्ये या नात्याने १०० वर्षापुर्वीपासुन वहिवाटदार नात्याने प्रत्यक्ष कब्जा व वहिवाटीस आहेत. वादी श्री. जैन बस्ती देव या कोरोची येथील मंदिराची पुजा अर्चा करीत असतात व दावा मिळकतीत कष्ट मशागत करुन पिके घेत असतात. दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी व पिक पाहणी सदरी भोगवटादार आणि वहिवाटदार नात्याने त्यांची नावे दाखल आहेत. प्रतिवादी हे कोरोची येथील रहिवाशी असुन स्वतःस जैन समाजाचे पुढारी म्हणवितात. त्यांना दावा जमिनीबाबत गैरवाजवी लालसा, जमिनीचे भाव प्रचंड वाढल्यामुळे निर्माण झाली आहे. प्रतिवादी दांडगाव्याने व बेकायदेशीरपणे वादींना दावा जमिनीतुन हुसकावुन लावण्याचा प्रयत्न करत असुन वादींच्या कब्जा वहिवाटीस हरकत करणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे आणि पिके पळवुन नेणे अशी कृत्ये सुरु केली आहेत. प्रतिवादींच्याविरुध्द पोलीस स्टेशनला आणि जिल्हा पोलीस प्रमुख यांच्याकडे तक्रारी देऊनसुध्दा कोणतीही कायदेशीर कारवाई त्यांच्यावर झाली नाही. प्रतिवादी दावा मिळकतीमधील वादींच्या शांततापुर्ण कब्जा व वहिवाटीस वारंवार हरकत अडथळा करीत राहतील, अशी धास्ती निर्माण झाल्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा आणि अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादीने नि. १२ कडे म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. त्यांनी अर्जातील मजकुर पुर्णपणे नाकारला आहे. त्यांचे म्हणणे की, दावा मिळकतीचे नेमके व पुरेसे वर्णन दिलेले नाही. वादीनी जैन बस्ती देव व जैन बस्ती मंदिर यांना दाव्यात पक्षकार केल नाही. त्यांच्या गैरहजेरीत सदर दाव्याचा गुणदोषावर निर्णय शक्य नाही. दावा मिळकती या देवाच्या आहेत. वादीना दावा जमिनीबाबत लालसा निर्माण झालेली आहे. वादीं संगनमताने पोलीसांमार्फत खोटा पुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादींच्या दाव्यास दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश १ नियम ८ ची बाधा येते व वादीनी आदेश ७ नियम ४, आदेश १ नियम ८ आणि कलम ९१, ९२

ची पुर्तता केलेली नाही. वादींचा वैयक्तीक नात्याने दावा मिळकतीमध्ये काहीही हक्कसंबंध नाही. श्री जैन बस्ती देव म्हणजेच १००८ दिगंबर जैन मंदिर ही नोंदणीकृत ट्रस्ट असुन त्याचा नोंदणी नंबर ४५०१ आहे. वादींनी सदरचा दावा प्रतिवादीकडे देखभालीसाठी असलेल्या शेतजमिनी बेकायदेशीर बळकावण्याच्या उद्देशाने, अप्रामाणिक हेतुने व स्वार्थी बुध्दीने दाखल केलेला आहे. वादीनी कधीच पुजा अर्चा, देखभाल, व्यवस्था व खर्च केलेला नाही. वादींचे नाव केवळ ७/१२ पत्रकी वारसा हक्काने दाखल झाल्याची माहिती मिळताच त्याबाबत प्रतिवादींनी योग्य त्या ठिकाणी दाद मागितली आहे. वादींच्या वडीलांची दावा शेतजमिनीत वहिवाट नव्हती व त्यांनी कधीही पुजाअर्चा केली नाही. श्री जैन बस्ती देव या जैन मंदिराची देखभाल, व्यवस्था कारभार हा गेल्या २० वर्षांहुन अधिक काळ कोरोची येथील नोंदणीकृत जैन समाजामार्फत करण्यात येत आहे. प्रतिवादी हे श्री जैन बस्ती देव म्हणजेच १००८ दिगंबर जैन मंदिर या समाजाकरीता दावा शेतजमिनीत वहिवाट करुन गतवर्षी सोयाबीन, ज्वारी पिके घेतली होती व या वर्षी शाळु पिक केले आहे. प्रतिवादीतर्फे सन २००७ पासुन देवाची पुजा अर्चा स्वतंत्र पंडित नेमुन करण्यात येत आहे. वादीनी पुजा अर्चा पुर्णपणे बंद केली आहे आणि पर्यायाने त्यांची शेताची व्यवस्था व कारभारही संपुष्टात आला आहे. दावा शेतजमिनीत वादींची एकटयाची कायदेशीर वहिवाट नव्हती व नाही. प्रतिवादींच्याकरीता व त्यांच्या नावाने आणि सांगण्यावरुन काही शेतीकाम केलेस ते कुळ होत नाहीतव त्यांना कायम हक्क प्राप्त होत नाही. वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती त्यानी केली आहे.

४. निर्णयासाठी उपस्थित मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष पुढीलप्रमाणेः

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीस सकृतदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २ | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३ | मनाई आदेश फेटाळल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | अर्ज फेटाळण्यात आला. |

<u>का र ण मिं मा सा</u>

५. वादीनी नि. ३, १४, २० सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. प्रतिवादीनी नि. १६,१८ सोबत कागदपत्रे व शपथपत्रे दाखल केलेली आहेत.

६. वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, दावा शेतजमिनी या जैन बस्ती देव या मंदिराच्या असुन वादींचे पुर्वहक्कदार व वादींची वहिवाट १०० वर्षांपुर्वीपासुन वंशपरंपरागत पध्दतीने आहे. प्रतिवादीनी नि. १४/१ ते १४/३ कडील नोटीसा दि. ३०.३.२०११ रोजी वादींना देऊन दावा शेतजमिनी वादींच्या ताब्यात असल्याचे मान्य केले आहे. दावा शेतजमिनी वादींच्या ताब्यात असल्याने वादी त्यांच्या कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी मनाई मिळणेसाठी प्रतिवादींच्याविरुध्द दावा दाखल करु शकतात. प्रतिवादी हे श्री १००८ दिगंबर जैन मंदिर या सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त आहेत. नि. १४/९ कडील सदर न्यायनोंदणीच्या अर्जामध्ये दावा मिळकतींचा समावेश नाही. प्रतिवादीनी नोंदविलेल्या 'श्री १००८ दिगंबर जैन मंदिर' या सार्वजनिक न्यासाचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. वादींच्या वकीलांनी ***Rame Gowda v/s. M. Varadappa, AIR 2004 SC 4609, Vainkat v/s. Vishwanath, 1983 MH.L.J. 284, Kantappa v/s. Krishanbai, AIR 1995 Kar. 213*** या निवाडयांचा आधार घेतला आहे.

७. प्रतिवादींच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादी हे दावा शेतजमिनीचे मालक नाहीत. नि. ३ सोबत दाखल केलेल्या ७/१२ वरती 'श्री जैन बस्ती देव' करीता कब्जा असल्याची व वहिवाट असल्याची नोंद आहे. वादींना दावा शेतजमिनीमध्ये स्वतंत्र हक्क नाही. वादी नं. ३ चे नाव दावा शेतजमिनीच्या ७/१२ उता-यावरती नाही. वादींचा दावा हा प्रतिनिधीक *(representative)* स्वरुपाचा आहे. वादी हे श्री जैन बस्ती देव मंदिराची पुजाअर्चा करत नसल्याने दावा जमिनी वहिवाटण्याचा हक्क संपुष्टात आलेला आहे. वादींच्या नावाची नोंद श्री जैन बस्ती देव मंदिर किंवा जैन समाजातील लोकांना नोटीसा न काढता घेण्यात आलेली आहे. वादीनी ठराव नं. ५४ दिनांक ३०.५.१९३३ दाखल केलेला नाही. त्यामुळे जैन बस्ती देव मंदिराची जमीन कोणत्या शर्थीवर दिली होती, ते स्पष्ट होत नाही. वादींचे पुर्वज किंवा वादींचे कायमस्वरुपी उपाध्ये म्हणुन नेमणुक केलेली नाही. प्रतिवादी श्री १००८ दिगंबर जैन मंदिर या नोंदणीकृत न्यासामार्फत दावा शेतजमिनीची देखभाल आणि वहिवाट करीत आहेत. वादींच्या दाव्यास दिवाणी व्यवहार संहितेचे कलम ९१, ९२ आदेश १ नियम ८, आदेश ७ नियम ४ ची बाधा येत आहे. त्यामुळे वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा.

मुद्दा क्रं. १ ते ४ करीताः-

८. यातील दावा मिळकती ह्या जैन बस्ती देव या मंदिराच्या आहेत. प्रतिवादी हे श्री १००८ दिगंबर जैन मंदिराचे विश्वस्त आहेत. सदर सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठीच्या

नि. १४। ९ कडील अर्जामध्ये स्थावर मिळकत म्हणून दावा मिळकतीचा समावेश नाही. नि. ३। १ ते ३। ११ कडील महसुली कागदपत्रावरुन दावा मिळकती देवस्थान अस्तित्वात आहे तोपर्यंत खर्चवेच होत आहे तोपर्यंत उत्पन्न चालणेचे आहे. वादीनी दावा जमिनीतील मिळणारे उत्पन्न व मंदिरासाठी केलेले खर्च याबाबतचा कोणताही तपशील किंवा हिशोब दिलेला नाही. त्याबद्दल प्रतिवादींचा आक्षेप आहे. या दाव्यात जैन बस्ती देव हे मंदिर जरी पक्षकार नसले, तरी दावा हा त्या मंदिराचे जमिनीकरीता आहे. सदरचे मंदिर। देवस्थान हे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणीकृत नाही.

९. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० मधील काही तरतुदी येथे नमुद करणे जरुरीचे आहे. त्या तरतुदी इंग्रजीत पुढीलप्रमाणे आहेत.

**<u>Section 2 (13)</u>** "**<u>Public Trust</u>**" means an express or constructive trust for either a public, religious or charitable purpose or both and includes a temple, a math, a wakf, church, synagogue, agiary or other place of public religious worship, a dharmada or any other religious or charitable endowment and a society formed either for a religious or charitable purpose or for both and registered under the Societies Registration Act, 1860.

**<u>Section 31 Bar to hear or decide suits:</u>-**

(1) No suit to enforce a right on behalf of a public trust which has not been registered under this Act shall be heard or decided in any Court.

(2) The provisions of sub-section (1) shall apply to a claim of set – off or other proceeding to enforce a right on behalf of such public trust.

**<u>Section 50. Suit by or against or relating to public trusts or trustees or others in any case:</u>-**

(i)where is alleged that there is a breach of a public trust, negligence, misapplication or misconduct on the part of a trustee or trustees,

(ii) where a direction or decree is required to recover the possession of or to follow a property belonging or alleged to be belonging to a public trust or the proceeds thereof or for an account of such property or proceeds from a trustee, ex - trustee, alienee, trespasser or any other person including a person holding adversely to the public trust but not a tenant or licensee,

(iii) Where the direction of the Court is deemed necessary for the administration of any public trust, or

(iv)for any declaration or injunction in favour of or against a public trust or trustee or trustees or beneficiary thereof, the Charity Commissioner after making such enquiry as he thinks necessary, or two or more persons having an interest in case the suit is under sub-clauses (i)to (iii), or one or more such persons in case the suit is under sub-clause (iv) having obtained the consent in writing of the Charity Commissioner as provided in section 51 may institute a suit whether contentious or

not in the Court within the local limits of whose jurisdiction the whole or part of the subject - matter of the trust is situate, to obtain a decree for any of the following relief's : -

(a) an order for the recovery of the possession of such property or proceeds thereof;

(b) the removal of any trustee or manager;

(c) the appointment of a new trustee or manager;

(d) vesting any property in a trustee;

(e) a direction for taking accounts and making certain enquiries;

(f) an order directing the trustees or others to pay to the trust the loss caused to the same by their breach of trust, negligence, misapplication, misconduct or willful default;

(g) a declaration as to what proportion of the trust property or of the interest therein shall be allocated to any particular object of the trust;

(h) a direction to apply the trust property or its income cy pres on the lines of section 56 if his relief is 55 claimed along with any other relief mentioned in this section;

(i) a direction authorising the whole or any part of the trust property to be let, sold mortgaged or exchanged or in any manner

alienated on such terms and conditions as the court may deem necessary;

(j) the settlement of scheme, or variation or alteration in a scheme already settled,

(k) an order for amalgamation of two or more trusts by framing a common scheme for the same;

(l) an order for winding up of any trust and applying the funds for other charitable purposes;

(m) an order for handing over of one trust to the trustees of some other trust and deregistering such trust;

(n) an order exonerating the trustees from technical breaches, etc;

(o) an order varying, altering, amending or superseding any instrument of trust;

(p) declaring or denying any right in favour of or against, a public trust or trustee or trustees or beneficiary thereof an issuing injunctions In appropriate cases; or

(q) granting any other relief as the nature of the case may require which would be a condition precedent to or consequential to any of the aforesaid relief's or is necessary in the interest of the trust:

Provided that no suit claiming any of the reliefs specified in this section shall be instituted in respect of any public trust,

except in conformity with the provisions thereof;

Provided further that, the Charity Commissioner may instead of instituting a suit make an application to the Court for a variation or alteration in a scheme already settled :

Provided also that, the provisions of this section and other consequential provisions shall apply to all public trusts, whether registered or not or exempted from the provisions of this Act under sub – section (4) of section 1.

**Section 79. Decision of property as public trust property:-**

(1) Any question, whether or not a trust exists and such trust is a public trust or particular property is the property of such trust, shall be decided by the Deputy or Assistant Charity Commissioner or the Charity Commissioner in appeal as provided by this Act.

(2) The decision of the Deputy or Assistant Charity Commissioner or the Charity Commissioner in appeal, as the case may be, shall, unless set aside by the decision of the Court on application or of the High Court in

appeal be final and conclusive.

**Section 80 Bar of jurisdiction :-**

Save as expressly provided in this Act, no Civil Court shall have jurisdiction to decide or deal with any question which is by or under this Act to be decided or dealt with by any officer or authority under this Act, and in respect of which the decision or order of such officer or authority has been made final and conclusive.

१०. प्रस्तुतचा दावा हा जैन बस्ती देव मंदिराचे जमिनीकरीता आहे. सदरचे मंदिर। देवस्थान हे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणीकृत नाही. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ३१ अन्वये या न्यायालयास प्रस्तुतचे दाव्याची सुनावणी किंवा निर्णय करता येणार नाही.

११. प्रस्तुत दाव्यात उपस्थीत केलेला वाद हा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ५० (iv) व (p) प्रमाणे आहे. सदर कलमातील तरतुतदीनुसार दावा दाखल करणेपुर्वी धर्मादाय आयुक्त यांची लेखी समत्ती कलम ५१ अन्वये घेणे जरुरीचे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ५० मधील तरतुदी या नोंदणीकृत नसलेले विश्वस्त व्यवस्थेलाही लागू आहेत. जैन बस्ती देव ही महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम २(१३) नुसार विश्वस्तव्यवस्था आहे. प्रस्तुत दावा दाखल करणेपुर्वी धर्मादाय आयुक्त यांची लेखी समत्ती घेतली नसलेने दावा चालू शकत नाही.

१२. दावा जमिनी जैन बस्ती देव या विश्वस्तव्यवस्थेच्या आहेत की श्री १००८ दिगंबर जैन मंदीर या विश्वस्तव्यवस्थेच्या आहेत याबाबतचा वाद या दाव्यामध्ये उपस्थित झालेला आहे. श्री १००८ दिगंबर जैन मंदीर ही नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था आहे. एखादी मिळकत विश्वस्तव्यवस्थेची आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ७९ नुसार उपधर्मादाय आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त किंवा

धर्मादाय आयुक्त यांना आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ८० नुसार, ज्या वादाचा निर्णय करण्याचा अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० अन्वये ज्या अधिकारी किंवा अधिकार मंडळास आहे, त्या वादाचा निर्णय करण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयास नाही. त्यामुळे प्रस्तुत दावातील जमिनी कोणत्या विश्वस्तव्यवस्थेच्या आहेत, याचा निर्णय या न्यायालयास करता येणार नाही.

१३. या सर्व बाबींचा विचार करता वादींचा दावा या न्यायालयात आहे त्या स्वरुपात व परिस्थीत चालू शकत नाही. त्यामुळे या अर्जात केलेल्या मागण्या मंजुर करता येणार नाहीत. परिणामी मुद्दा क्रं. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी दिले आहे व मुद्दा क्रं. ४ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

आ दे श

१. वादींचा अर्ज फेटाळण्यात आला.

२. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावयाचा आहे.

सही/-

दि. २७.३.२०१५ ( विश्वास शि. माने )

इचलकरंजी सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. S. P. Sawant |
| Name of Court | Shri. V. S. Mane, Jt. C.J.J.D., Ichalkaranji. |
| Date of Dictation | 27.3.2015 |
| Judgment Signed by the P.O. on | 01.04.2015 |
| Judgment uploaded on | 01.04.2015 |